प्रेस नोट दिनांक ०२/०६/२०२२.

दिनांक १०/०९/२०२१ रोजी साकिनाका पोलीस ठाणे हद्दीतील खैराणी रोड, येथे उभ्या असलेल्या टेम्पोमध्ये एका महीलेवर लैगिंक अत्याचार झाल्याबाबत साकीनाका पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक. ९३७/२०२१ नोंद करण्यात आला.

नमुद गुन्ह्यामध्ये दिनांक १०/०९/२०२१ रोजीच आरोपी नामे मोहन कथवारू चौहान यांस अटक करण्यात आली. तपासादरम्यान दिनांक ११/०९/२०२१ रोजी बळीत महीला उपचारादरम्यान मयत झाली. नमुद गुन्हयाचे गांभिर्य पाहता सदर गुन्ह्याच्या तपासाकरीता विशेष तपास पथक (S.I.T.) नेमण्यात आली.

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील ( पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था), मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, बांद्रा, मुंबई, मा. श्री. महेश्वर रेड्डी (पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १०) यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी सपोआ जोत्स्ना विलास रासम यांनी गुन्ह्याच्या तपासादरम्यान साक्षिदार तसेच तांत्रीक पुरावा प्राप्त केला होता. तसेच आरोपीताची गेट प्रोसेडिंग घेण्यात आली होती.नमुद गुन्ह्याचा तपास १८ दिवसात पुर्ण केला व मा. सत्र न्यायालय, दिडोंशी, मुंबई येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

नमुद गुन्ह्यामध्ये श्री. राजा ठाकरे यांची विशेष विधी तज्ञ व श्री. महेश मुळे यांची विशेष पोलीस अभियोक्ता म्हणुन नेमणुक करण्यात आली. जमा केलेल्या सबळ पुराव्या अन्वये नमुद घटला मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्रमांक ११, श्रीमती एच. सी. शेंडे यांचेसमोर चालविण्यात आला. नमुद गुन्ह्याच्या सुनावणीदरम्यान ३७ साक्षिदार तपासण्यात आले.

सदर गुन्ह्याची सुनावणी पुर्ण झाली असुन आज रोजी आरोपी नामे मोहन कथवारू चौहान याचेविरोधात मा. सत्र न्यायालयाने कलम ३०२ भादवी नुसार मरेपर्यंत फाशी व रू. १०,०००/— दंड. कलम ३७६(A) भादवी नुसार मरेपर्यंत फाशी. कलम ३७६(२)(M)भादवी नुसार आजन्म कारावास. सह ३७(१),(A),१३५ महाराष्ट्र पोलीस ॲक्ट अन्वये ६ महिने शिक्षा व रू.२,०००/— दंड, दंड न भरल्यास २ महिने कारावास शिक्षा सुनावली आहे. कलम ३(१)(W) अनुसूचीत जाती जमाती अत्यांचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ नुसार २ वर्षे कारावास व रू. ५,०००/— दंड व कलम ३(२)(V) अनुसूचीत जाती जमाती अत्यांचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ नुसार आजन्म कारावास व रू.५,०००/— दंड अशी शिक्षा सुनावली आहे.